# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.10.2025** **वारःसोमवार**

---

1. महाराष्ट्राला राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत केंद्रीय हिस्स्याचा दुसरा हप्ता म्हणून दीडहजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर
2. भारतीय उत्पादनं खरेदी करून 140 कोटी भारतीयांच्या कठोर परिश्रम, सर्जनशीलता आणि नवोपक्रमाचा उत्सव साजरा करण्याचं पंतप्रधानांचं देशवासियांना आवाहन
3. देशभरात दिपावलीचा उत्साह
4. अमेरिकेत अध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांच्या प्रशासन आणि धोरणांच्या विरोधात सर्व राज्यांमध्ये निदर्शनं
5. कर्नाटकमध्ये सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षणाला 31 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ आणि
6. पन्नास षटकांच्या क्रिकेटमध्ये भारतीय महिला संघाचा इंग्लंडकडून तर पुरुष संघाचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव

**राज्य आपत्ती मदत**

केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शाह यांनी वित्त वर्ष 2025-26 साठी महाराष्ट्र राज्याला राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत केंद्राच्या हिस्स्याचा दुसरा हप्ता म्हणून 1 हजार 566 कोटी 40 लाख रुपये निधी मंजूर केला आहे. यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं बाधित झालेल्या नागरिकांना तत्काळ मदत आणि पुनर्वसनासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही बातमी दिली. या मदतीसाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत. ही अग्रिम मदत असून अंतिम मदत प्राप्त करण्यासंदर्भातील प्रक्रिया अजून सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान-स्वदेशी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व नागरिकांना भारतीय उत्पादनं खरेदी करून 140 कोटी भारतीयांच्या कठोर परिश्रम, सर्जनशीलता आणि नवोपक्रमाचा उत्सव साजरा करण्याचं आवाहन केलं आहे. MyGovIndia वर सोशल मीडिया पोस्टला उत्तर देताना, पंतप्रधानांनी भारतीय उत्पादनं खरेदी करून 'गर्व से कहो ये स्वदेशी है' असं म्हणण्यावर भर दिला आहे. यंदाच्या दिवाळीत लोकांनी केवळ स्वदेशी उत्पादनं खरेदी करण्याची आणि देशातील स्थानिक कारागिरांना पाठिंबा देण्याची प्रतिज्ञा करावी. लोकांनी खरेदी केलेल्या स्वदेशी वस्तूंची माहिती आणि त्या वस्तू तयार करणाऱ्यांसोबतची छायाचित्रं सोशल मीडियावर सामायिक करण्याचं आणि इतरांनाही अशीच प्रेरणा देण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

**अयोध्या दीपोत्सव**

दीपावलीनिमित्त उत्तरप्रदेशात अयोध्या नगरीत शरयू नदीच्या किनाऱ्यावर काल भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. राम की पौडीसह शरयू नदीवरील 56 घाटांवर 26 लाखांपेक्षा जास्त पणत्या प्रज्वलित करून नवा गिनीज विश्वविक्रम नोंदवण्यात आला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी दोन हजाराहून अधिक वेदाचार्यांनी शरयू नदीच्या काठावर महाआरती केली. या सोहळ्यात रामायणावर आधारित नृत्य आणि लेजर शो देखील झाला.

**शुभेच्छा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन् यांनी दिवाळीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. दीपावलीचा हा सण अंध:कारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाच्या आणि अर्धमावर धर्माच्या विजयाचं प्रतिक आहे. देशाच्या विविध भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

राज्यात सर्वत्र दीपोत्सवाचा उत्साह दिसत आहे. आज नरकचतुर्दशीला पहाटे अभ्यंगस्नान, देवदर्शन केल्यानंतर चविष्ट फराळाची लगबग घरोघरी दिसत आहे. आकाशकंदील, पणत्या आणि दिव्यांची रोषणाई याबरोबरच लहानग्यांनी केलेले मातीचे किल्ले लक्ष वेधून घेत आहेत. बाजारपेठामध्येही चैतन्याचं वातावरण आहे. दिवाळीच्या निमित्तानं सर्वत्र सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळत आहे. यंदाच्या दिवाळीवर मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टिचं सावट आहे, या अतिवृष्टीग्रस्तांची तसंच वंचित घटकांची दिवाळी गोड करण्यासाठी अनेक सामाजिक उपक्रमांचं आयोजनही करण्यात येत आहे.

**अमेरिका-नो किंग्ज निदर्शने**

अमेरिकेत, राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या प्रशासन आणि धोरणांना विरोध करण्यासाठी नो किंग्ज निदर्शनांमध्ये सर्व 50 राज्यांमधून हजारो लोक रस्त्यावर उतरले. अमेरिकेतील विविध शहरांमध्ये 2 हजार 700 पेक्षा जास्त निषेध कार्यक्रमांमध्ये सुमारे 70 लाख लोक सहभागी झाले होते असं माध्यमातील बातम्यांमध्ये म्हटलं आहे. हुकूमशाहीला नकार आणि अमेरिकन लोकशाहीचं रक्षण करणं असा या निदर्शनांचा उद्देश होता. लोकशाही मूल्यांचा ऱ्हास, कठोर स्थलांतर कायद्यांची अंमलबजावणी, शहरांमध्ये संघीय सैन्य तैनात करणं आणि आरोग्यसेवेसारख्या सरकारी कार्यक्रमांमध्ये कपात यावर निदर्शकांनी चिंता व्यक्त केली. निधीच्या वादातून संघीय सरकारचं कामकाज बंद असल्यानं, अमेरिकेत हे तणावपूर्ण राजकीय वातावरण निर्माण झालं आहे. डेमोक्रॅटिक सदस्यांनी शांततापूर्ण निदर्शनांना जोरदार पाठिंबा व्यक्त केला आहे.

**जीएसटी-आरोग्यसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्यानुसार गेल्या महिन्याच्या 22 तारखेला सुरू झालेल्या जीएसटी बचत उत्सवाचा समाजातील सर्व घटकातील लोकांना लाभ होत आहे. जीएसटी सुधारणांमुळे देशाच्या आरोग्यसेवा क्षेत्राला बळकटी मिळत आहे. पुढच्या पिढीतील जीएसटी सुधारणांमुळें नागरिकांना लक्षणीय दिलासा मिळाला आहे आणि औषधं आणि इतर वैद्यकीय संबंधित उत्पादनं अधिक परवडणारी बनण्याद्वारे देशाचं आरोग्यसेवा क्षेत्र बळकट झालं आहे. कर्करोग आणि गंभीर जुनाट आजारांवर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 36 जीवनरक्षक औषधांवरील कराचे दर पूर्वीच्या 12 टक्क्यांवरून पूर्ण वगळण्यात आले आहेत. त्याचप्रमाणं, गॉझ, बँडेज, निदानात्मक संच, ग्लुकोमीटर आणि थर्मामीटर यांसारख्या आवश्यक औषधं आणि वैद्यकीय उपकरणांवर आता पूर्वीच्या 12 टक्क्यांवरून 5 टक्के जीएसटी आकारला जातो. सरकारनं आरोग्य आणि जीवन विमा प्रीमियमवरील पूर्वीचा 18 टक्के कर माफ केला आहे. यामुळं प्रीमियमची रक्कम कमी राहील आणि नागरिकांना विमा घेण्यास प्रोत्साहन मिळेल.

**कर्नाटक-जात**

कर्नाटक सरकारनं सध्या सुरू असलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षणाला 31 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली असल्याचं कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी काल स्पष्ट केलं. कर्नाटक राज्य मागासवर्गीय आयोगाच्या नेतृत्वाखालील हे सर्वेक्षण 22 सप्टेंबर रोजी सुरू झालं आणि सुरुवातीला 7 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणार होतं. त्याला 18 ऑक्टोबरपर्यंत मध्यावधी मुदतवाढ मिळाली होती. आता प्रशासनानं आणखी मुदतवाढ देण्याचा पर्याय निवडला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी काल वरिष्ठ मंत्री, अधिकारी आणि आयोगाचे अध्यक्ष मधुसूदन आर. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सर्वेक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठक घेतली. शिक्षकांव्यतिरिक्त इतर सरकारी कर्मचाऱ्यांना आता गणना पूर्ण करण्याचं काम सोपवलं जाईल अशी घोषणा शिवकुमार यांनी माध्यमांशी बोलताना केली. 60 प्रश्नांच्या स्वरूपावर आधारित या सर्वेक्षणासाठी 420 कोटी रुपये खर्च येण्याचा अंदाज आहे.

**<u>सर्वोच्च न्यायालय-जामीन</u>**

सर्वोच्च न्यायालयानं जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे राज्य सरकारांकडून गरीब कैद्यांच्या जामिनाची रक्कम देण्यासाठी पूर्वीच्या मानक कार्यप्रणालीतबदल केले आहेत. या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी जिल्हा पातळीवर एक अधिकारप्राप्त समिती स्थापन केली आहे. न्यायाधीश एम.एम. सुंदरेश आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठानं अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी आणि वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांनी केलेल्या सूचनेचा स्वीकार करून हा आदेश दिला. जामिनाच्या आदेशाच्या सात दिवसांच्या आत कैद्याची सुटका झाली नाही, तर नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार तुरुंग अधिकाऱ्यांनी आता जिल्हा समितीच्या सचिवांना कळवायचं आहे.

**<u>उत्सव-फास्टॅग भेट</u>**

वर्तमान सणासुदीच्या काळात, तुमच्या कुटुंबाला आणि मित्रांना FASTag वार्षिक पास भेट देऊन एक सुरळीत आणि अखंड प्रवास अनुभव देता येणार आहे. याद्वारे त्यांना देशभरातील राष्ट्रीय महामार्ग आणि राष्ट्रीय द्रुतगती महामार्गांवर वर्षभर विनासायास प्रवास करता येईल. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या राजमार्गयात्रा मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे गैर-व्यावसायिक वाहनांना वार्षिक पास भेट म्हणून देता येईल. तीन हजार रुपये किंमत आणि एक वर्षाची वैधता असलेला हा पास भारतातील अंदाजे 1 हजार 150 पथकर नाक्यांवर लागू आहे.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

महिलांच्या क्रिकेटमध्ये, इंदूरच्या होळकर मैदानावर आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडच्या संघानं काल भारताचा 4 धावांनी पराभव केला. इंग्लंडनं दिलेल्या 289 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला 50 षटकांत 6 बाद 284 धावाच करता आल्या. हीथर नाईटला सामनावीराचा किताब मिळाला. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर निर्धारित 50 षटकांत 8 गडी गमावून 288 धावा केल्या.

**<u>क्रिकेट</u>**

तिकडे, पुरुषांच्या क्रिकेटमध्ये पर्थ इथं झालेल्या पन्नास षटकांच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं काल भारतावर 7 गडी राखून मात केली. पावसाच्या व्यत्ययामुळं सामना चार वेळा थांबवण्यात आला. परिणामी सामना प्रत्येकी 26 षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 26 षटकांत नऊ बाद 136 धावा केल्या. डकवर्थ-लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी 131 धावांचं लक्ष्य होतं. ते त्यांनी 22व्या षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं. या विजयामुळं तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियानं 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.